# 📘 उद्योगात पहिले पाऊल टाकण्यासाठी आवश्यक असलेली सखोल, मार्गदर्शक माहिती गाईड

मित्रांनो,

हा केवळ एक document  नाही – हे एक दिशादर्शक, मार्गदर्शक आणि यशदर्शक गाईडआहे, ज्यामध्ये आजचा भारतीय उद्योजक, व्यापारी, शेतकरी, गृहिणी आणि तरुणांना जागतिक व्यापाराच्या दिशेने पहिलं पाऊल टाकायला मदत होईल.

आपण कित्येक वेळा मनात म्हणतो – “एक्सपोर्ट करायचंय!”, “आपला माल परदेशात न्यायचाय!” पण माहिती नसते, मार्गदर्शन नसतं, आणि योग्य दिशा मिळत नाही. म्हणूनच ही संधी सतत हुलकावणी देत राहते.

Made with GAMMA

# 🛑 पण आता संधी समोर उभी आहे.

या माहितीमध्ये आहे:

- भारत सरकारच्या बदलत्या धोरणांचा उपयोग करून आपण कसा फायदा मिळवू शकतो
- एक्सपोर्टसाठी आवश्यक तयारी, लायसन्सेस, बँक व्यवहार, मार्केट रिसर्च आणि ग्राहकांपर्यंत पोहोचण्याच्या आधुनिक पद्धती
- Zero Investment Export, Visibility Octagon, Power Technique यांसारख्या नावीन्यपूर्ण आणि परिणामकारक प्रणाली
- आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे – हे सगळं शिकून तुमच्या स्वतःच्या हातूनच तुमचं ब्रँड घडवण्याची ताकद!

जर तुम्ही एक प्रॉडक्ट हाताळत असाल, दर्जा टिकवू शकत असाल, आणि थोडं धाडस दाखवू शकत असाल – तर यशाचं आकाश तुमच्यासाठी खुलं आहे.

ही माहिती वाचणं म्हणजे केवळ ज्ञान मिळवणं नाही – तर स्वतःच्या यशासाठी दरवाजा उघडणं आहे.

म्हणूनच, ही संधी गमावू नका...

- पूर्ण माहिती काळजीपूर्वक वाचा
- मनात शंका असेल तरी वाचा
- कारण हे वाचून तुम्ही 'Exporter' होण्याच्या मार्गावर असाल!

### ✈️ चला तर मग – आपलं प्रॉडक्ट ग्लोबल करूया!

Wave Riders तुमच्यासोबत आहे – आता थोडं धाडस आणि थोडी तयारी बाकी आहे...

आपल्या महाराष्ट्रात उत्पादनांची काहीही कमी नाही फक्त थोडे धाडस आणि थोडी तयारी जरुरी असते. स्वतःच्या सामर्थ्यावर विश्वास ठेवा !पहिले पाऊल आत्मविश्वासाने उचला!

Made with GAMMA

# वेव रायडर्स इंटरनॅशनल व्हेंचर एलएलपी द्वारे प्रस्तुत

Made with GAMMA


# एक्स्पोर्ट च्या जगात तुमचे मनापासून स्वागत आहे



स्वतःचा उत्पादन व्यवसाय चालवणारे उद्योजक



हातात दर्जा आणि सचोटी आहे अशी अगदी घरबसल्या दर्जेदार होम प्रॉडक्ट्स बनवणारी कर्तव्यदक्ष गृहिणी




रिटायर्ड सिनिअर सिटीझन



कष्टाळू प्रामाणिक कृषिवल

Made with GAMMA

# EXPORT TRAINING WORKSHOP: जगभर व्यापार करण्याचा टप्प्याटप्प्याने प्रवास

मित्रांनो तुम्ही एक कुशल व्यापारी असाल, प्रोडक्शनची सखोल समज असलेले उत्पादक असाल किंवा कष्टाळू आणि प्रामाणिक शेतकरी असाल किंवा ज्यांच्या हातात दर्जा आणि सचोटी आहे अशी अगदी घरबसल्या दर्जेदार होम प्रॉडक्ट्स बनवणारी कर्तव्यदक्ष गृहिणी असाल. जर आपल्या प्रॉडक्ट च्या गुणवत्तेवर तुम्हाला विश्वास असेल आणि आपल्या प्रोडूक्टसाठी परदेशात ग्राहक शोधण्याचे स्वप्न माझ्याप्रमाणे तुम्हीही बघत असाल तर एक्स्पोर्ट च्या जगात तुमचे मनापासून स्वागत आहे आणि हि माहिती तुमच्यासाठीच आहे.

मित्रांनो, तुम्हाला आपल्या पंतप्रधानांचे हे वाक्य आठवतंय का? "यही समय है, सही समय है!" भारत सध्या एका मोठ्या परिवर्तनाच्या टप्प्यावर उभा आहे. सरकारने 5 ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था घडवण्याचं मोठं लक्ष्य ठेवलं आहे आणि यामध्ये एक्सपोर्ट हे एक मुख्य इंजिन आहे. त्यामुळेच धोरणं, अनुदानं आणि सुलभ प्रक्रिया यामध्ये मोठी गुंतवणूक सुरू आहे.आज भारतात हायवेचे उत्तम जाळे तयार झाले आहे, देशभरात अत्याधुनिक पोर्ट्स उभे राहिले आहेत आणि सर्व प्रक्रिया हळूहळू पूर्णतः डिजिटलाईस होत आहेत. पूर्वी लागणारी भरभराट कागदपत्रं आता बोटांवर मोजण्याइतकी शिल्लक राहिलीयेत. आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे GST मुळे टॅक्सेशन अतिशय सुलभ झालं आहे. आणि माहित आहे का तुम्हाला एक्सपोर्टवर GST लागताच नाही... तो शून्य (Zero Rated) असतो.

Made with GAMMA

# Zero Investment Export आणि आधुनिक पद्धती

आजच्या काळात इ-कॉमर्स एक्स्पोर्ट ट्रेड आणि LCL सारख्या सुविधांमुळे अगदी मर्यादित गुंतवणुकीतूनही सुरुवात करता येते. अनेक लोक आज घरातूनच व्यवसाय चालवत आहेत. Inventory साठवून ठेवणं टाळून smart sourcing आणि योग्य partnerships वापरून बरेच exporters आज यशस्वीपणे ऑर्डर्स पूर्ण करत आहेत. काही स्मार्ट एक्सपोर्टर तर शून्य गुंतवणुकीतही व्यवसाय उभा करतात. सप्लायर सोबत जॉईंट व्हेंचर करून अगदी शून्य इन्व्हेस्टमेंट मध्ये आपला एक्स्पोर्ट चा व्यवसाय चालवतात आणि घरबसल्या डॉलर्स मध्ये नफा कमावतात.

एक महत्त्वाचं सत्य म्हणजे – आजही भारतात फार कमी लोक निर्यात करतात. त्यामुळे तुम्ही या व्यवसायात उतरलात, तर स्पर्धा तुलनेत कमी आणि संधी प्रचंड आहे. तुम्ही डॉक्टर असाल, इंजिनिअर, विद्यार्थी, गृहिणी, वकील… काहीही असाल – व्यवसायाची पार्श्वभूमी नसली तरी काही हरकत नाही. पण एक गोष्ट हवी – तुम्हाला शिकायची तयारी पाहिजे. कारण स्वप्न पुरेशी नसतात अभ्यास आवश्यक असतो. काही लोक इंग्रजी नीट येत नाहीत म्हणून हा व्यवसाय करायला चाचरतात. पण अहो भाषा हि अडथळा नाही हे एक कौशल्य आहे. आज संवाद साधण्याच्या कित्येक पद्धती उपलबध आहेत. इकडून मराठी मध्ये बोला तिकडे चीन मधला ग्राहक त्याच्या भाषेत ऐकतो आणि त्याचे बोलणे आपल्याला मराठीत ऐकायला मिळते. भाषा हि वेळेअनुसर विकसित होते. जास्त महत्त्वाचं असतं – आत्मविश्वास, स्पष्टता आणि खरी माहिती. महत्त्वाचं असतं -आपल्या व्यवसायाचे योग्य नॉलेज. आजकाल सोशल मीडिया हे एक अतिशय प्रभावी माध्यम बनले आहे. माहितीचा कितीतरी साठा इंटरनेट वर उपलबध आहे. आपण याचा फायदा नक्की करून घ्यायला पाहिजे.

Made with GAMMA

# WAVE RIDERS: एक्स्पोर्ट ट्रैनिंग वोर्कशॉप आणि POWER टेक्निक

आपल्या गरजांचा अभ्यास करूनच WAVE RIDERS ने एक्स्पोर्ट ट्रैनिंग वोर्कशॉप सुरु केलं आहे. सुरुवातीचे काही सेशन्स हे ऑनलाईन असतात. आणि शेवटी एक मोठे ट्रैनिंग असते ते स्वतः जाऊन अटेंड करायचे असते. या ट्रैनिंग मध्ये सगळ्यात पहिले तर एक्सपोर्टर चा माइण्डसेट शिकवतात. एक्सपोर्टर बनण्यापूर्वी एक्सपोर्टर सारखा विचार करता यायला पाहिजे. मग प्रोसेस चा अभ्यास कसा करायचा हे शिकवलं जात.

काही लोकांची प्रॉडक्ट्स आधीपासून तयार असतात, तर काहींना ती शोधायची असतात. पण हे लक्षात घ्या – चुकीच्या पद्धतीने निवडलेलं प्रॉडक्ट तुमचा व्यवसाय दीर्घकाळ टिकवू शकत नाही. कधी व्यवसाय बंद होतो, तर कधी पुन्हा नव्याने प्रॉडक्ट बदलावं लागतं. आणि सतत प्रॉडक्ट बदलत राहिलं की, आपल्या ब्रँडची विश्वासार्हता आणि ओळख – दोन्ही घटते. म्हणूनच, प्रॉडक्ट कसं शोधायचं आणि योग्य निर्णय कसा घ्यायचा, यासाठी एक ठोस प्रणाली शिकवली जाते – यालाच 'POWER टेक्निक' असे म्हणतात. या पद्धतीमधून तुम्ही शिकता की तुमच्या उद्योगासाठी योग्य प्रॉडक्टची निवड कशी करायची. ही टेक्निक म्हणजे निव्वळ थिअरी नसते तर मार्केट रिसर्च, ट्रेंड्स, शिपिंग सुलभता, आणि प्रॉफिट मार्जिन यांचा एक व्यावहारिक आणि सिद्ध संयोग असतो. इथे तुम्हाला या टेक्निकचं सविस्तर आणि step-by-step प्रशिक्षण देऊन प्रॉडक्ट शोधण्यात मास्टर बनवले जाते.

### एक्सपोर्टर माइंडसेट

एक्सपोर्टर बनण्यापूर्वी एक्सपोर्टर सारखा विचार करता यायला पाहिजे.

### प्रॉडक्ट निवड

योग्य प्रॉडक्ट निवडण्यासाठी 'POWER टेक्निक' शिकवली जाते.

### मार्केट रिसर्च

मार्केट रिसर्च, ट्रेंड्स आणि प्रॉफिट मार्जिनचा अभ्यास.

Made with GAMMA

# VISIBILITY OCTAGON आणि व्यावहारिक प्रशिक्षण

"आपल्याकडे पैसे असतात... गरजही असते...तरीही आपण रस्त्यावर भेटलेल्या अनोळखी व्यक्तीकडून काहीच विकत घेत नाही. का बरं?" कारण आपल्याला त्याच्यावर विश्वास नसतो. हीच गोष्ट परदेशातील ग्राहकांना लागू होते. आपण त्यांच्या दृष्टीने एक 'अनोळखी' असतो. त्यामुळे ते लगेच आपल्यासोबत व्यवहार करायला तयार होत नाहीत. मग मग त्याच्यापर्यंत पोचायचं कसं? यासाठी सर्वात आधी आपल्याला ग्राहकांची मानसिकता समजून घ्यावी लागते. त्यांच्याशी नीट ओळख करावी लागते. पण ते ग्राहक विदेशात आपण इकडे भारतात बोलणे भेटणे कस शक्य आहे? आपल्याकडे त्यांचे फोन नंबर इ मेल काहीच नसते. हा भाग शिकण्यासाठी WAVE RIDERS एक खास अशी method शिकवतात त्याला VISIBILITY OCTAGON म्हटलं जात. ही ८ पारंपरिक आणि आजमावलेली तंत्रं एकत्रित करून तयार केलेली यंत्रणा आहे, जी तुमचा बायरपर्यंतचा प्रवास सुकर करते. हे सगळं शिकून आपल्याया त्याचे रूपांतर VISIBILITY ENGINE मध्ये करता यायला पाहिजे. जो हे शिकला तो प्रशक्षित एक्सपोर्टर म्हणून ओळखला जातो. मग त्याला ग्राहकांमागे फिरावे लागत नाही स्वतः ग्राहक त्याच्याकडे येऊन ऑर्डर देतात.

आपण स्वतः जे काही करून पाहतो, तेच आपल्याला कायम लक्षात राहतं. म्हणूनच WAVE RIDERS कडून दिलं जाणारं प्रशिक्षण हे केवळ ऐकण्यापुरतं नाही तर ते अनुभवावर आधारित असते. इथे तुम्हाला वेगवेगळ्या ACTIVITIES करायला दिल्या जातात जसं की वेगवेगळ्या डॉक्युमेंट्स स्वतः तयार करणं, वेगवेगळ्या प्रॉडक्ट्सच्या सप्लायर्ससोबत संवाद साधून डीलिंग करणे, विदेशातील संभाव्य बायरसोबत बोलून व्यवहार साध्य करणं, ChatGPT सारख्या अत्याधुनिक AI टूल्सचा वापर करून कामं वेगानं आणि हुशारीनं कशी करता येतील, हेही तुम्ही शिकता, आणि पोर्ट व कस्टम्सच्या क्लिष्ट प्रक्रियांचं सखोल महत्व समजून घेऊन त्याचा सराव करणं. प्रत्येक टप्प्यानंतर तुमच्या सरावाचा आणि प्रगतीचा सतत आढावा घेतला जातो. म्हणजे केवळ माहितीच नाही, तर अनुभव, आत्मविश्वास आणि अंमलबजावणी यावर भर दिला जातो.

Made with GAMMA

# डॉक्युमेंटेशन, बँकिंग आणि डिजिटल मार्केटिंग

Ports आणि CHA Documentation.ची सगळी प्रक्रिया तर अनेक नवख्या लोकांसाठी अक्षरशः भीतीदायक असते. BL, EIR, CLP, LEO यांसारखी डॉक्युमेंट्स आणि त्यांच्याशी रिलेटेड अशी प्रोसेस अंगावर काटा आणणारी असते. पण ट्रेनिंग नंतर हे सगळे अगदी सहज सोपे वाटायला लागते. आपण हि सगळी डॉक्युमेंट्स नीट चेक करायला शिकतो. त्यामुळे पुढच्या चुका अव्हॉइड करायला मदत होते आणि तुमचा आत्मविश्वासही वाढतो.

बँकेचे व्यवहार हा एक्स्पोर्ट प्रक्रियेचा एक अविभाज्य घटक असतो. विदेशातील ग्राहकांसोबतचा पैशांचा व्यवहार हा थेट नाही, तर बँकांच्या माध्यमातूनच केला जातो. Advance Payment असो, Letter of Credit असो, किंवा Payment Against Documents –या सर्व गोष्टी बँकिंग चॅनल्सद्वारे पार पडतात. म्हणूनच, हे व्यवहार समजून घेणं आणि त्यात आत्मविश्वास मिळवणं गरजेचं असते. त्यामुळेच बँकिंगसंबंधित प्रक्रिया देखील आपल्या ट्रेनिंगचा एक महत्त्वाचा भाग असतो. कधी कधी तुम्हाला Working Capital Loan किंवा Pre-Shipment Finance घ्यावं लागतं, त्यासाठी देखील बँकेकडे योग्य पद्धतीने Approach करणं, आणि Exporter म्हणून तुमची Case सादर करणं गरजेचं असते. तुमचं फाईलिंग बँकेच्या दृष्टीने योग्य पद्धतीनं केल्यास लोन मिळवणं अधिक सोपं होतं. WAVE RIDERS हेच सगळे व्यवहार तुम्हाला योग्य पद्धतीने शिकवतात.

अनेकदा आपल्याला आपल्या प्रॉडक्टची जाहिरात YouTube, Facebook अशा डिजिटल प्लॅटफॉर्मवर करावी लागते. पण जेव्हा आपण एखाद्या एजन्सीकडे ही जाहिरात करण्याची जबाबदारी देतो, तेव्हा Advertising Agencies आपल्याकडून अव्वाच्या सव्वा पैसे घेतात. कधी कधी आपल्याला नक्की काय केलं जातंय हेही समजत नाही. म्हणूनच WAVE RIDERS मध्ये तुम्हाला हे सगळं स्वतः शिकायला मिळतं. जेणेकरून तुम्हाला दुसऱ्यावर अवलंबून राहावं लागणार नाही

YouTube Ads, Facebook Lead Generation, Boosting, Audience Targeting, Creative Writing या सगळ्या गोष्टी तुम्ही प्रत्यक्षात करून शिकता आणि तुमचा ब्रँड, तुमच्याच हाताने तयार करत जाता. या कौशल्यांचं मुख्य वैशीष्ट्य म्हणजे तुम्ही जाहिरातीत स्वयंपूर्ण होता, बजेटवर कंट्रोल ठेवता, आणि खर्च न करता पण Visibility वाढवू शकता.

स्वतःचे व्हिडीओ स्वतः एडिट करून पब्लिश करणं — हे खरंच एक मजेशीर आणि समाधान देणारं काम असतं. शब्द तुमचे, आवाज तुमचा, अनुभव तुमचा – आणि आता व्हिडीओ तयार करण्याचं कौशल्यही तुमचंच! शिकायला सुरुवात झाली की अनेक जण म्हणतात, "हे आपण एवढं दिवस दुसऱ्यांकडून का करून घेतलं?" छोट्या छोट्या क्लिप्स एकत्र करून, त्यात मजेशीर म्युझिक, टेक्स्ट, फोटो किंवा तुमचं बोलणं टाकून, एक सुंदर व्हिडीओ तयार करणं म्हणजे तुमच्या गोष्टीचं सर्जनशील रूप तयार करणं असतं. आणि जेव्हा तो व्हिडीओ तुम्ही Instagram, YouTube, Facebook सारख्या ठिकाणी स्वतः पब्लिश करता, तेव्हा लोक त्यावर रिॲक्ट करतात, लाईक्स, मेसेजेस, कमेंट्स येतात – आणि त्यातून तुमचा आत्मविश्वास हळूहळू वाढायला लागतो. तेव्हा वाटतं – "आपण आता खरंच स्वतःचा ब्रँड घडवत आहोत!"

Made with GAMMA

# व्यवसाय सेटअप आणि Wave Riders समुदाय

आता आपण वळूया सगळ्यात महत्त्वाच्या टप्प्यावर – आणि तो म्हणजे, व्यवसायाचं सेटअप. कोणताही व्यवसाय सुरू करताना, सर्वप्रथम आपल्याला एक कंपनी रजिस्टर करावी लागते.त्यासोबतच, एक्सपोर्ट व्यवसायासाठी आवश्यक असणारी सर्व सरकारी लायसन्सेस आणि रजिस्ट्रेशन्स काढावी लागतात.

ही सगळी प्रक्रिया, कधी कागदपत्रांची गर्दी, कधी ऑफिसमधून ऑफिसला फेऱ्या, कधी वेळप्रसंगी चुकीच्या सल्ल्यामुळे पैसे आणि वेळ दोन्ही वाया जाणं, अतिशय थकवणारी आणि गुंतागुंतीची ठरू शकते. अनेक लोक विविध एजंटांकडे जाऊन हजारो रुपये खर्च करूनही कामात अडथळे येतात, किंवा चुकीची माहिती दिली जाते. पण WAVE RIDERS परिवारात सहभागी झाल्यावर ही सगळी अडचण संपते.

कारण आमच्याकडे ही सगळी प्रक्रिया एकाच ठिकाणी, पारदर्शक दरात आणि संपूर्ण मार्गदर्शनासह पूर्ण केली जाते. WAVE RIDERS ची टीम तुमच्यासाठी – ✓ कंपनी रजिस्ट्रेशन ✓ IEC, GST, AD Code, MSME,Port रेजिस्ट्रेशन ✓ आणि प्रॉडक्टनुसार आवश्यक इतर लायसन्सेस – सर्व व्यवस्थित आणि वेळेत पूर्ण करून देते. तुमच्याकडून फक्त आवश्यक माहिती आणि दस्तऐवज घेतले जातात बाकी सगळी प्रक्रिया पारदर्शकतेने आणि वेळेत पूर्ण करणे हे आमचं काम! यामुळे तुमचा बिझनेस लवकर सुरू होतो, आणि तुम्ही मुख्य गोष्टींवर लक्ष केंद्रित करू शकता.

Wave Riders चे प्रशिक्षण एकूण ८ भागांमध्ये ऑर्डरली (Orderly) रचलेलं आहे. प्रत्येक भाग म्हणजे निर्यात प्रक्रियेतील एक महत्वाचा टप्पा असतो –एक टप्पा पूर्णपणे समजून घेतल्याशिवाय पुढच्या टप्प्यावर जाणं योग्य ठरत नाही. तुमचं उद्दिष्ट निर्यातीमध्ये गंभीरपणे प्रवेश करणं असेल, तर ट्रेनिंग योग्य क्रमाने व शिस्तबद्ध रचनेतच शिकणं अधिक फायदेशीर ठरतं.

💰 शिकण्यासाठी दोन पर्याय उपलब्ध असतात - पहिला पर्याय - एकावेळी संपूर्ण ट्रेनिंगची फी भरून सर्व ८ भाग ॲक्सेस करा. 👉 ज्यांना पूर्ण तयारीने सुरुवात करायची आहे, त्यांच्यासाठी हा पर्याय सर्वोत्तम.

किंवा, दुसरा पर्याय - तुमच्या बजेटनुसार एकेका भागासाठी स्वतंत्र फी भरून टप्प्याटप्प्याने शिकत जा. 👉 ज्यांना सुरुवातीला अनुभव घ्यायचा आहे, त्यांच्यासाठी लवचिक पर्याय पण दिलेला असतो

Wave Riders च्या वेबसाइटवर एकदा भेट दिलीत, की –कोणते टप्पे आहेत, काय शिकायला मिळणार आहे,आणि पुढचं पाऊल काय असू शकतं असं ट्रेनिंगचं संपूर्ण रचनाबद्ध चित्र डोळ्यासमोर स्पष्ट होतं.

पण इथेच गोष्ट थांबत नाही... ट्रेनिंग घेतल्यानंतर सगळ्या सहभागी सदस्यांना एका खास WhatsApp कम्युनिटीमध्ये जोडलं जातं –जिथे केवळ चर्चा नाही, तर एकमेकांना मदत, मार्गदर्शन, प्रोत्साहन मिळतं.

खरंतर ही कम्युनिटी म्हणजेच Wave Riders कुटुंब. आणि आपल्या कुटुंबाच्या मदतीला प्रत्येक जण हा तत्पर असतो. सारंग सर स्वतः या कुटुंबासाठी नियमितपणे मोफत अपडेट्स, मार्गदर्शन सत्रं, आणि रिअल एक्सपोर्ट अनुभव शेअर करत असतात.यामुळे शिकणं एका कोर्सपुरतं मर्यादित राहत नाही – आपण प्रत्यक्षात निर्यातदाराचं आयुष्य जगायला सुरुवात करतो.

Wave Riders च्या WhatsApp कम्युनिटीमध्ये एकदा सामील झालात, की फक्त शिकणं नव्हे –तर शिकलेलं वास्तवात उतरवण्याचा, कृतीत आणण्याचा प्रवास सुरू होतो. प्रत्येक ट्रेनिंग सेशननंतर तुम्हाला विशिष्ट ॲक्टिव्हिटी दिली जाते. ही ॲक्टिव्हिटी म्हणजे होमवर्क नव्हे, तर निर्यातीच्या जगतातलं तुमचं पहिलं पाऊल असतं. आणि या ॲक्टिव्हिटीज पूर्ण करत असताना जेंव्हा खरे प्रश्न समोर येतात, तेंव्हाच खरी शिकवण सुरु होते. त्याक्षणीच तुम्हाला सारंग सरांचं मार्गदर्शन गरजेचं वाटतं – आणि ते वेळच्या वेळी मिळतं.






1. आज आपण सारंग सरांना एक तज्ज्ञ निर्यात मार्गदर्शक (Export Mentor) म्हणून ओळखतो. पण हे स्थान अचानक मिळालेलं नाही. त्यांचा संपूर्ण प्रवास शिकवण्याच्या आणि शिकण्याच्या विविध टप्प्यांतून तयार झालेला आहे. ते आज ट्रेनर आहेत, कारण ते आयुष्यभर 'शिकवण्याच्या भूमिका' पार पाडत आलेत. कॉर्पोरेट संस्थांमध्ये जबाबदाऱ्या सांभाळताना, त्यांनी अनेक टीम्स घडवल्या, मार्केटिंग ते ऑपरेशन्सपर्यंत असंख्य लोकांना ट्रेन केलं, गाइड केलं, आणि पुढे नेलं. त्यांनी शिकवणं कधीच थांबवलं नाही – फक्त त्याचं स्वरूप बदलत गेलं. कोविद नंतर आपला पूर्ण वेळ 'निर्यात शिक्षण आणि भारतीय उद्योजकांच्या घडणीकडेच देण्याचा त्यांनी निर्णय घेतला आणि ५ वर्षांच्या अथक परिश्रमानंतर आज WAVE RIDERS INTERNATIONAL VENTURES ची स्थापना झाली आज जेव्हा आपण Wave Riders चं नाव ऐकतो, तेव्हा त्यामागे केवळ एक ट्रेनिंग प्रोग्राम नसतो, तर सारंग सरांच्या २०+ वर्षांच्या अनुभवाचं, विचारांचं, आणि मूल्यांचं प्रतिबिंब असतं.

मित्रांनो, भारत बदलतो आहे. अनेक देशांसोबत आपले ट्रेड ॲग्रीमेंट झाले आहेत. काही देशांनी तर भारतीय प्रॉडक्ट्सवरची इम्पोर्ट ड्युटी पूर्णपणे हटवली आहे. संपूर्ण जग आज भारताकडे आशेने पाहत आहे. कारण भारतीय मालाची, विशेषतः भारतीय गुणवत्तेची, एक जागतिक ओळख आहे. शतकानुशतकांपासून जगाच्या जिभेवर आपल्या मसाल्यांची चव आहे. आजही, अनेक देशांमध्ये "मसाला" म्हटले की, भारतीय मसाल्याची मागणी होते. हीच गोष्ट आता सोप्या आणि नव्या तंत्रज्ञानासोबत इतर हजारो प्रॉडक्ट्सना लागू होते – फक्त गरज आहे योग्य दर्जा राखण्याची आणि तीव्र इच्छाशक्तीची. आता वेळ आली आहे –आपल्या देशाचे नाव जागतिक पातळीवर अभिमानाने पुढे नेण्याची.जर आपण आता पुढे आलो नाही, तर उद्या तुमचेच प्रॉडक्ट दुसरे लोक विकतील. श्रम तुमचे, अनुभव तुमचा, पण नाव आणि यश दुसऱ्याचं असेल. दरवर्षी हजारो लोक म्हणतात – "कधी तरी एक्सपोर्ट सुरू करायचंय..."पण त्यांच्या 'कधी तरी'ची कधीच वेळ येत नाही. कारण त्यांच्याकडे ना मार्ग होता, ना मार्गदर्शक. पण तुमच्या बाबतीत तसं होणार नाही – कारण Wave Riders आता तुमच्या दाराशी उभं आहे. 👉 तुमच्या हातात संधीचं दार आहे... प्रश्न इतकाच आहे – दरवाजा उघडणार आहात का? की नेहमीप्रमाणे "पुढच्या वेळेस पाहू"म्हणणार? निर्णय तुमचा!

Made with GAMMA

# फक्त थोडं धाडस आणि थोडी तयारी बाकी आहे हो

तुम्ही आतापर्यंत वाचलेली माहिती ही प्रक्रिया, योजना आणि तयारी याबाबत होती. पण प्रत्येक यशस्वी सुरुवातीच्या मागे एक प्रेरणा असते – एक आवाज, जो म्हणतो: "मी काहीतरी अजून मोठं काम करू शकतो" महाराष्ट्राची जमीन, उत्पादनं, आणि लोकशक्ती अपार आहे… पण सगळ्यात महत्त्वाचं आहे – थोडं धाडस आणि थोडी तयारी. ही पुढील कविता तुम्हाला आठवण करून देईल की, तुमचं उत्पादन, तुमचा आत्मविश्वास, आणि तुमचं 'शिकण्याचं' मनोबल मिळूनच एक्सपोर्टचा प्रवास सुरू होतो.

📜 **कविता वाचताना फक्त शब्द नाही, तुमची उर्मी शोधा…**

सांगोल्याचे डाळिंब, नागपूरची संत्री

नाशिक ची द्राक्ष आणि जळगाव ची केळी

महाराष्ट्रात काऽय कमी आहे हो?

**फक्त थोडं धाडस आणि थोडी तयारी बाकी आहे हो**

कोकणातले हापूस आणि विदर्भाचा कापूस

सोलापूरची चादर आणि कोल्हापूरची चप्पल

महाराष्ट्रात काऽय कमी आहे हो?

**फक्त थोडं धाडस आणि थोडी तयारी बाकी आहे हो**

सगळं रान सजल आहे रानोमाळ भिजलं आहे

मलाच एक माझं प्रॉडक्ट दिसत का नाही हो

मीच एक एक्सपोर्टर का बनू शकत नाही हो

**फक्त थोडं धाडस आणि थोडी तयारी बाकी आहे हो**

आपल्या मातीत जिद्द कमी नाही ना हो

उमेद हुनर काही कमी नाही ना हो

आपल्या मालाला मागणी आहे ना हो?

**फक्त थोडं धाडस आणि थोडी तयारी बाकी आहे हो**

संधी आहे, क्षमता आहे - ग्लोबल बाजार तयार आहे

शिकायला वेळ आहे -झेप घ्यायला आकाश आहे

- माझं प्रॉडक्ट आहे → मग काय अडचण आहे?
- गुंतवणूक कमी लागते म्हणे? → मग मी का थांबलोय?
- भाषा अडथळा नाही → मग आता कारण काय?
- शिकण्यासाठी सिस्टीम आहे → मग सुरुवात कधी?

पण हे सगळं करायचं कोणासाठी हो?

**फक्त थोडं धाडस आणि थोडी तयारी बाकी आहे हो**

**लिंक वरती क्लिक करा आजच एक्स्पोर्ट ट्रैनिंग जॉईन करा .तुमच्या प्रॉडक्ट ला जगभरात पोचवा !**

Made with GAMMA